# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. २७१/ २०२५

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विविध शैक्षणिक विभागामध्ये नियमितपणे पदवी, पदव्युत्तर पदवी, पी.एच.डी अभ्यासक्रमास प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, विद्यापीठ परिसरातील भोजनगृहाकरीता नेमावयाच्या गुणवत्ता नियंत्रण समितीमध्ये विद्यार्थी सदस्य स्वरुपात सहभागी होण्याकरीता इच्छुक विद्यार्थ्यांनी त्यांच्या विभागप्रमुखांमार्फत सहायक कुलसचिव, गृहव्यवस्थापन विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांना दि. १५.१०.२०२५ पर्यत लेखी स्वरुपात अर्ज सादर करावेत.

१. सदर विद्यार्थी सदस्यांमध्ये एकूण १० विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात येईल यामध्ये ५ विद्यार्थी व ५ विद्यार्थ्यींनी सदस्य अशी समिती रचना असेल. (विद्यार्थी अथवा विद्यार्थ्यींनी यांचे पुरेसे अर्ज प्राप्त न झाल्यास सदर सदस्यपद रिक्त ठेवण्यात येईल.)

२. यापूर्वी भोजनगृह गुणवत्ता नियंत्रण समितीमध्ये असलेल्या विद्यार्थ्यांनी सदर समितीसाठी अर्ज करु नये, असे अर्ज प्राप्त झाल्यास त्यांचा विचार केला जाणार नाही.

३. भोजनगृह गुणवत्ता नियंत्रण समितीमधील विद्यार्थी सदस्यांचा कार्यकाळ त्यांचा समितीमध्ये समावेश केल्यापासून १ वर्ष कालावधीसाठी असेल.

४. भोजनगृह गुणवत्ता नियंत्रण समितीचे गठण फक्त विद्यापीठातील भोजनगृहासाठीच करण्यात आलेले असून सदर समिती भोजनगृह व उपहारगृह दक्षता समितीच्या सूचनांनुसार कार्यरत राहील.

शिवाजी उत्तेकर
**शिवाजी उत्तेकर**
**सहायक कुलसचिव**

**गणेशखिंड, पुणे — ४११००७.**
**जावक क्र. गृव्य /८३३/२०२५**
**दिनांक : ०६/१०/२०२५.**

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी** :

१. **सर्व विभागप्रमुख, शैक्षणिक विभाग, सा.फु.पु.वि.** : यांना विनंती करण्यात येते की, आपल्या विभागामध्ये उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांच्या निदर्शनास सदरचे परिपत्रक आणून द्यावे.

२. **मा. व्यवस्थापक आय.टी.सेल** : कृपया सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करावे.